कुलसचिव

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

वाचा- १) महसुल, वन, आपत्ती निवारण तथा पुनर्वसन विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. No. DMU/2020/CR.92/DisM-1, Dated : 4th April, 2021.

२) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अकोला जिल्हा यांचे आदेश क्र. कक्ष२/गृह/प्र.स./कावि १५३/२०२१, दिनांक: ०५/०४/२०२१

## परिपत्रक

क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक/४३/२०२१

दिनांक : ०६/०४/२०२१

कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्याकरीता राज्य शासनाने संपूर्ण राज्यात दिनांक ३० एप्रिल, २०२१ पर्यंत लॉकडाऊन बाबत आदेश निर्गमित केलेले आहेत. संर्भाकित पत्र क्र. २ मध्ये टाळेबंदी कालावधीमधील मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला आहे.

उपरोक्त संदर्भाकित पत्राच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, अकोला यांनी कोरोना विषाणूचा संसर्ग पसरू नये याकरीता उपाय योजनेची एकत्रित सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केली आहे.

सदर पत्रातील मार्गदर्शक तत्वांचा आधार घेऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) विद्यापीठातील सर्व कार्यालये, महाविद्यालये, संशोधन केंद्रे व इतर संस्था यांच्या प्रशासकीय कार्यालयातील (आरोग्य सेवा, सुरक्षा सेवा व अत्यावक्षक सेवेतील कर्मचारी वगळून) ५०% कर्मचारी यांचे उपस्थितीबाबत कार्यालयप्रमुख यांनी परिपत्रकातील निर्देशाचे काटेकोरपणे पालन करावे.

२) विद्यापीठातील सर्व कार्यालयांचे कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख, प्रभारी अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी यांची कार्यालयातील १०० % उपस्थिती अनिवार्य राहील.

३) विज, पाणीपुरवठा, पशुधन संबंधित अधिकारी / कर्मचारी, सेवा देणारे कार्यालय १०० % अधिकारी/ कर्मचारी क्षमतेसह सुरु राहील.

४) विद्यापीठातील सर्व कार्यालयातील बैठका हया एकाच कार्यालयात असतील तर ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्या.

५) विद्यापीठातील सर्व कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या अभ्यांगतांची गर्दी नियंत्रित करण्यासाठी, अभ्यांगतांना कार्यालयात प्रवेश असणार नाही.

६) सदर आदेशातील अ.क्र. १२ अन्वये- सर्व प्रकारच्या शाळा, महाविद्यालये बंद राहतील. तसेच शैक्षणिक संस्था बंद असल्या तरी ऑनलाईन अध्यापनाव्दारे शैक्षणिक सत्र चालू राहतील.

७) विद्यापीठ परिक्षेत्रातील शेती, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, मत्सव्यवसाय, कृषिविषयक व इतर अनुषंगिक कामे असणारे विभाग/ केंद्र/ कार्यालये निर्देशाप्रमाणे कार्यरत राहतील.

८) विद्यापीठ अधिनस्त बाग-बगीचे तथा खेळांची मैदाने याबाबत संबंधित नियंत्रण अधिकारी हे संदर्भाकित परिपत्रक क्र. २ मधील मुद्दा क्र. २ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करतील.

९) सदर आदेशातील अ.क्र. १९ अन्वये- विद्यापीठ अभियंता बांधकामासंदर्भात आवश्यक कार्यवाही करतील.

१०) विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी, विभाग प्रमुख, प्रभारी अधिकारी, प्राचार्य तसेच त्यांचे अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी यांनी निर्गमित शासन आदेशाचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.

उपरोक्त आदेश हे जिल्हाधिकारी, अकोला यांनी अकोला जिल्हयाकरीता निर्गमित केलेले आहेत. तथापि विद्यापीठ परिक्षेत्रातील अकोला जिल्हा वगळता इतर जिल्हयातील विद्यापीठ अधिनस्त कार्यालयांच्या बाबतीत संबंधित कार्यालय प्रमुख यांनी संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा. कुलगुरु महोदयांचे मंजुरीने निर्गमित.

कुलसचिव

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

**प्रतिलीपी :**

१) संचालक (सर्व) ---------------------------------------------------------------

२) अधिष्ठाता (सर्व) ---------------------------------------------------------------

३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ---------------------------------------------------------------

४) विभाग प्रमुख (सर्व) ---------------------------------------------------------------

५) प्राचार्य (घटक व संलग्न महाविद्यालय, विद्यालय, तंत्र निकेतन) ---------------------------------------

६) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ---------------------------------------------------------------

७) नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला

८) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

९) कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ---------------------------------------------------------------

१०) मा. कुलगुरूंचे तांत्रिक सचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

११) जनसंपर्क अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१२) मा. कुलगुरूंचे /कुलसचिवांचे स्वीय सहायक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१३) सहायक कुलसचिव (साप्रवि/आस्था/परिक्षा/समिती), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१४) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१५) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

१६) ---------------------------------------------------------------